## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. १५/५/२०१८

**विषय क्रमांक :– १४० त्वर्य**

पुणे स्टेशन येथील कैलास स्मशानभूमी मध्ये प्रस्तावित विद्युत दाहिनी करिता इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मदन एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२७,५३,५६१=२० पेक्षा २१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,००,७५,३१३=३४ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६२ दि.१०/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४१ त्वर्य**

प्रभाग क्र. ४८ अ मध्ये अल्पना टॉकीज येथील कल्व्हर्टचे काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,९७,९९,९७५/– पेक्षा ६.५०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३,१७,३६,९७३=३८ निविदा अटी शर्तीप्रमाणे अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व देयके अदा करणे व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/६३ दि.१०/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४२ त्वर्य**

प्रभाग क्र. ३७ क आईमाता मंदिर ते व्ही.आय.टी.हॉस्टेल/पासलकर चौक दरम्यान ३० मी. व २४ मी.रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रुषभ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९७,९३,९२०/– पेक्षा ७.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९१,०८,३४५=६० उपलब्ध तरतुदी पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/६५ दि.१४/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १४३ त्वर्य**

मा.सुनिल टिंगरे यांचे दि. ९/५/२०१८ चे पत्र.

वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण करणेबाबत

वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गाचे काम सध्या गतीने सुरु आहे. हा मेट्रो मार्ग वनाज ते रामवाडी पासून पुढे वाघोली पर्यंत विस्तारीत करण्यात यावा तसेच यामध्ये लोहगाव विमानतळाचाही समावेश करण्यात यावा. तसेच भविष्यात तो मेट्रो मार्ग रांजणगाव एमआयडीसी पर्यंत बनविता येईल अशा पध्दतीने धोरण राबविण्यात यावे कारण :–

१) वाघोली व पुणे परिसरातील लोकसंख्या साधारणपणे २० टक्क्यांनी वाढली असून सर्वच जनता ये–जा करणे व वाहतुकीसाठी पुणे नगररोडचा वापर करीत आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची खुप मोठी वर्दळ असते. तसेच

पुणे शहर व परिसरातील विमानतळावर ये–जा करणारी सर्वच जनता याच मार्गाचा अवलंब करीत आहेत त्यामुळे वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मेट्रो मार्ग वरीलप्रमाणे करणे सोयीचे ठरेल.

२) रांजणगाव, सणसवाडी व कोरेगाव भिमा येथील एमआयडीसी मध्ये काम करणारे जास्तीत जास्त कामगार पुणे शहर व आसपास राहण्यास असून त्यांना आणण्या–नेण्यासाठी कंपनीची जी वाहने येतात त्यांची संख्या ही खुप मोठी असते. त्यामुळे पुणे नगर रोडवर खुप मोठया प्रमाणावर वाहतुक असते व वारंवार वाहतुक कोंडी होत राहते.
३) अवजड वाहनांनाही पर्यायी मार्ग नसल्याने सर्व वाहने याच मार्गाने ये–जा करतात. त्यामुळेही वारंवार वाहतुक कोंडी होत राहते. तसेच या मार्गावर अपघाताचे प्रमाणातही दिवसेंदिवस वाढ होत आहे.
४) पुणे नगर रोड लगतच्या गावामधील बरेचसे नागरिक नोकरीनिमित्त पुणे शहरात येतात.
५) पुणे नगर रोड लगतच्या गावातील शेतकरी शेतामध्ये पिकवलेला भाजीपाला विक्रीसाठी पुण्यामध्ये घेऊन येण्यासाठी पुणे नगर रोडचाच वापर करतात.
६) सदर वाहनांची वर्दळ व वाहतुक कोंडी मुळे सामान्य नागरिक खुपच त्रस्त आहेत.

तरी या सर्वांवर दिर्घ कालीन उपाय योजना म्हणून वर सुचविलेला मेट्रो मार्ग खुप गरजेचा आहे. त्यामुळे रामवाडी ते वाघोली व रामवाडी ते विमानतळ या दोन्ही मार्गाचा डीपीआर (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट) लवकरात लवकर करण्यात यावा.

**विषय क्रमांक :– १४४ त्वर्य**

सन २०१७–२०१८ महापौर चषक आंतरकचेरी क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनास व त्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्रीडा/१०६९ दि. २३/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.क्रिडा समिती ठराव क्र. ५ दि.२६/४/२०१८ विचारासाठी.

१)स्पर्धा आयोजनास व त्याप्रित्यर्थ र.रुपये २,१०,०००/– पर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास
२) स्पर्धेत विजयी होणाऱ्या खेळाडूंच्या/संघाचे नावे बक्षिसे र.रुपये१,५०,०००/– पर्यंत RTGS द्वारे अदा करणेस

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**